
मराठी

# कुमारभारती

इयत्ता नववी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्‌दल दयाबुद्‌धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



## मराठी

# कुमारभारती

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

FH1UZH

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
तिसरे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

श्री. समाधान शिकेतोड
श्री. बापू शिरसाठ
श्रीमती प्रांजली जोशी
श्रीमती वैदेही तारे
श्री. मयुर लहाने
प्रा. विजय राठोड
डॉ. माधव बसवंते
श्री. देविदास तारू
श्री. संदीप रोकडे
श्रीमती स्मिता गालफाडे
डॉ. प्रमोद गारोडे
श्री. प्रमोद डोंबे
श्री. शिवा कांबळे
डॉ. सुभाष राठोड
श्री. मोहन शिरसाट
श्री. नाना लहाने
डॉ. शारदा निवाते
श्रीमती अनुजा चव्हाण
श्री. प्रवीण खैरे
श्रीमती प्रतिभा लोखंडे
डॉ. मंजूषा सावरकर
श्रीमती जयमाला मुळीक
श्रीमती स्वाती ताडफळे
डॉ. नंदा भोर
डॉ. कमलादेवी आवटे
श्री. हेमंत गव्हाणे

**निमंत्रित तज्ज्ञ**

श्री. शिवाजी तांबे
डॉ. सुजाता महाजन

**प्रकाशक**

विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ, यशवंत देशमुख

**मुखपृष्ठ** : आभा भागवत

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** : N/PB/2021-22/1.00

**मुद्रक** : M/s. Hitech Graphics, Panvel

# भारताचे संविधान

## उद्‌देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्‌धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्‌वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन-अधिनायक जय हे
भारत-भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता नववीच्या वर्गात स्वागत आहे. 'कुमारभारती' मराठी हे तुमच्या आवडीचे भाषेचे पुस्तक! इयत्ता नववीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा वापर करतो. मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, कल्पना, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

या पाठ्यपुस्तकातून विविध साहित्यप्रकारांची ओळख तुम्हांला करून दिली आहे. महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांची तुम्हांला ओळख व्हावी, म्हणून बोलीभाषेतील उतारेही दिले आहेत. ते वाचून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे, हे लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, म्हणून या पुस्तकात अनेक भाषिक कृती दिल्या आहेत.

पाठ्यपुस्तकात तुमच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती व सृजनशीलतेला संधी देण्यासाठी अनेक कृती दिल्या आहेत, त्या कृती तुम्ही जरूर करा. भाषाभ्यासाच्या कृतींतून भाषेचे घटक, त्यांचे उपयोग समजावून घ्या. त्याचबरोबर लेखनक्षमता व अभिव्यक्ती विकास यांसाठी विविध कृती व नमुने दिले आहेत, त्यांचा तुम्ही अभ्यास करा. या कृतींतून तुमच्यातील लेखनकौशल्य व वाङ्मयीन अभिरूची नक्कीच वाढणार आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही तुम्हांला करावयाचा आहे व त्याचे फायदेही समजून घ्यायचे आहेत. पाठ्यघटकाशी संबंधित पूरक माहितीसाठी पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या संदर्भग्रंथ सूचीचा व संकेतस्थळांचा अभ्यासासाठी वापर करावा असे आम्हांला वाटते.

तुमच्या कल्पकतेला आणि विचारांना चालना देणाऱ्या या पाठ्यपुस्तकाबाबतचे तुमचे मत आम्हांला नक्की कळवा.

तुम्हां सर्वांना शुभेच्छा !

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : २८ एप्रिल, २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

# भाषाविषयक क्षमता : प्रथम भाषा मराठी

**इयत्ता नववीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
| --- | --- |
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या, चर्चा व संवाद समजपूर्वक ऐकता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणांवरील सूचना समजपूर्वक ऐकता येणे.<br>३. घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकता येणे.<br>४. विनोद, गाणी, कविता, कथा व संवाद ऐकून आनंद घेता येणे.<br>५. गीते, समूहगीते, कविता, वक्त्यांची भाषणे व विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.<br>६. विविध बोलीभाषा लक्षपूर्वक व समजपूर्वक ऐकता येणे. |
| भाषण संभाषण | १. गाणी, कविता, समूहगीते स्वराघातासह म्हणता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांच्या सादरीकरणाचे मूल्यमापन करता येणे.<br>३. प्रसंगानुरूप व विषयानुरूप स्वत:चे विचार समोरील व्यक्तीला पटवून देता येणे.<br>४. विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या चर्चेत सहभाग घेता येणे.<br>५. प्रभावी भाषण-संभाषणाच्या कौशल्यांचा उपयोग करता येणे.<br>६. विविध साहित्यप्रकारांच्या माध्यमांतून आपले विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करणे. |
| वाचन | १. पाठ्यपुस्तक व पाठ्येतर साहित्याचे समजपूर्वक व अर्थ लक्षात घेऊन प्रकट वाचन करता येणे.<br>२. योग्य आरोह-अवरोह व विरामचिन्हे यांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकट वाचन करता येणे.<br>३. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.<br>४. विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>५. आंतरजालावर उपलब्ध असलेल्या संकेतस्थळावरील माहितीचे वाचन करून, त्या माहितीचा उपयोग करता येणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचून स्वमत निश्चित करता येणे. |
| लेखन | १. श्रुतलेखन करताना शुद्धलेखनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करता येणे.<br>२. ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याच्या आशयावरील काढलेल्या टिपणांच्या मुद्द्यांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. म्हणी, वाक्प्रचार, शब्दसमूह, सुभाषिते यांचा वापर करून प्रभावी लेखन करता येणे.<br>५. दिलेल्या विषयावर स्वतंत्र व प्रभावी लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग यांवर आधारित चिकित्सक विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.<br>७. घडलेले प्रसंग, कार्यक्रम, घटना यांचे वृत्तान्त लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या उपयोजित लेखन घटकांवर लेखन करता येणे. |

**अध्ययन कौशल्य**

१. संदर्भासाठी शब्दकोश पाहता येणे.
२. दिलेल्या विषयावर मुद्देसूदपणे स्वमत स्पष्ट करता येणे.
३. विविध कार्यक्रमांचा अहवाल तयार करता येणे.
४. आपल्या व इतर बोलीभाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांची यादी करून विषयनिहाय, अर्थनिहाय वर्गीकरण करता येणे.
५. ऑनलाइन अर्ज भरणे, बिले भरणे यांसारख्या सुविधांचा वापर करता येणे.
६. सोशल मिडियाच्या योग्य व जबाबदार वापराबाबत जाणीव निर्माण होणे.
७. संगणकावरील साहित्याचा वापर करताना संबंधितांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे.
८. प्रसारमाध्यमे/संगणक इत्यादींवरून उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, चिकित्सक विचार करता येणे.
९. संगणक/आंतरजालाच्या साहाय्याने भाषांतर/लिप्यंतरण करता येणे.
१०. विविध सामाजिक समस्यांबाबत होणाऱ्या चर्चेमध्ये सहभागी होऊन आपले विचार मांडता येणे.

**भाषाभ्यास**

१. रूपक, व्यतिरेक, दृष्टान्त, चेतनगुणोक्ती अलंकार ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
२. आर्या, दिंडी ही मात्रावृत्ते ओळखता येणे.
३. नवरस ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे, त्यांचा आस्वाद घेता येणे.
४. शुद्धलेखनाच्या नियमांचा लेखनामध्ये उपयोग करता येणे.

## शिक्षकांसाठी

मराठी कुमारभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ, कविता, गीते, कृती, स्वाध्याय यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. तसेच व्याकरण घटकांची मनोरंजक, सोप्या व कार्यात्मक पद्धतीने मांडणी केली आहे. उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींतून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्यातील निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांसही संधी मिळणार आहे.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी. त्याचबरोबर या विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्कातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचा अर्थ लक्षात घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा व त्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरणा द्यावी.

मराठी कुमारभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका


## भाग – १

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | वंद्य 'वन्दे मातरम्' (गीत) – ग. दि. माडगूळकर | १ |
| २. | संतवाणी | |
| | (अ) जैसा वृक्ष नेणे– संत नामदेव | ३ |
| | (आ) धरिला पंढरीचा चोर–संत जनाबाई | ६ |
| ३. | कीर्ती कठीयाचा दृष्टान्त – म्हाइंभट | ८ |
| ४. | नात्यांची घट्ट वीण – मीरा शिंदे | १० |
| ५. | एक होती समई – उत्तम कांबळे | १३ |
| ❁ | हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन) – मधुकर धर्मापुरीकर | १७ |

## भाग – २

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ६. | या झोपडीत माझ्या (कविता) – राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | २२ |
| ७. | दुपार – राजीव बर्वे | २५ |
| ८. | अभियंत्यांचे दैवत–डॉ. विश्वेश्वरय्या – डॉ. यशवंत पाटणे | ३० |
| ९. | मी वाचवतोय (कविता) – सतीश काळसेकर | ३४ |
| १०. | यंत्रांनी केलं बंड – भालबा केळकर | ३६ |
| ❁ | इंग्लंडचा हिवाळा (स्थूलवाचन) – इरावती कर्वे | ४२ |

## भाग –३

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ११. | मातीची सावली – स्टॅन्ली गोनसाल्विस | ४६ |
| १२. | महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया (पोवाडा) – अण्णा भाऊ साठे | ५२ |
| १३. | थोडं 'आ' भारनियमन करूया – मंगला गोडबोले | ५४ |
| १४. | आदर्शवादी मुळगावकर – गोविंद तळवलकर | ५९ |
| १५. | निरोप (कविता) – पद्मा गोळे | ६३ |
| ❁ | 'बिग ५'च्या सहवासात (स्थूलवाचन) – जयप्रकाश प्रधान | ६६ |

## भाग –४

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १६. | वनवासी (कविता) – तुकाराम धांडे | ७१ |
| १७. | ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ – बाळ ज. पंडित | ७३ |
| १८. | हसरे दु:ख – भा. द. खेर | ७६ |
| १९. | प्रीतम – माधुरी शानभाग | ८२ |
| २०. | आपुले जगणे...आपुली ओळख!(कविता) – संदीप खरे | ८६ |
| ❁ | विश्वकोश (स्थूलवाचन) | ८८ |
| ♦ | उपयोजित लेखन | ९४ |